# यशस्वी होण्यासाठी स्वत:वर बंधने घाला

## कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वतःवर चांगल्या प्रकारची बंधने घालणे गरजेचे आहे. कार्यालयीन कामे जलदगतीने पूर्ण करण्यासाठी कामाचा आनंद घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने विद्यापीठामधील कार्यरत हंगामी रोजंदारी लेखनिक व रोजंदारी शिपाई यांच्यासाठी दि. १८ ते २२ जानेवारी या कालावधीत मानव्यशास्त्र सभागृहामध्ये आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठामध्ये काम करण्याची संधी मिळाली, याचा प्रत्येकाने अभिमान बाळगळा पाहिजे. कार्यालयीन कामे करताना सकारात्मकता बाळगून उत्तम कार्य केले पाहिजे. सहकार्याची व सहकाराची बांधणी चांगल्या प्रकारे करण्याचे कौशल्य असले पाहिजे. विद्यापीठातील नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असून कार्यालयीन वेळेचा सदुपयोग करण्यासाठी प्रत्येकाने दक्ष राहिले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत बोलताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.

कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांनी कार्यालयीन कामांमध्ये वेळेचे व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण आदी उपस्थित होते.

# चंदगडी भाषेची राष्ट्रीय पातळीवर दखल

## यूजीसी अभ्यासक्रमात समावेशाने गौरव

**चंदगड : पुढारी वृत्तसेवा**

हलकर्णी (ता. चंदगड) येथील प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी चंदगडी भाषेवर गेल्या काही दिवसांपासून संशोधन केले आहे. त्यामुळे या चंदगडी भाषेचे विविध पैलू समोर आले आहेत. चंदगडी भाषेला आता शासनमान्यता मिळाली आहे. या भाषेची दखल राष्ट्रीय पातळीवरही घेण्यात आली असून यूजीसी अभ्यासक्रमात तिचा समावेश करण्यात आला आहे.

शिवाजी विद्यापीठाचे अधिव्याख्याता प्रा. मोरे यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाने चंदगडी भाषेचा समावेश अभ्यासक्रमातही केला आहे. दहावीच्या मराठी पुस्तकात चंदगडी बोलीवर त्यांचा उतारा होता. चंदगड तालुका हा कोल्हापूर जिल्ह्याच्या शेवटच्या टोकाला वसला आहे. पूर्वेला कर्नाटक राज्याची सीमा, पश्चिमेला सिंधुदुर्ग जिल्ह्याची, तर दक्षिणेला गोवा राज्याची सीमा अशा त्रिवेणी संगमावर चंदगड तालुक्याची रचना आहे. भौगोलिक क्षेत्र खूप मोठे आहे. त्यामुळे पूर्वेकडील भागातील लोक कन्नडमिश्रित मराठी बोलतात. पश्चिमेकडील लोक गोवा, कोकणी भाषा बोलतात. अशी संमिश्र असलेली भाषा चंदगड तालुक्यात बोलली जाते. भाषा ऐकताना खूप नवल वाटते.

कन्नड मराठी, कोकणी, इंग्रजी आणि पोर्तुगीज या भाषेचा प्रभाव असणाऱ्या चंदगडी भाषेवर डॉ. मोरे यांनी संशोधन केले आहे. तालुक्यात १५७ वाड्या-वस्त्या आहेत. यामधून सव्वादोन लाख लोक चंदगडी भाषा बोलतात. या भाषेचा समावेश शासनाने अधिकृत बोली भाषेत केला आहे. या भाषेची वैशिष्ट्ये, त्यातील शब्द, भाषेचा इतिहास या सर्वच अंगांनी मोरे यांनी संशोधन केले आहे. त्यामुळे ही बोली भाषा राष्ट्रीय पातळीवर गेली आहे. त्यांच्या संशोधनामुळे महाराष्ट्र शासनाने बोली भाषा म्हणून चंदगडी भाषेला मान्यता दिली आहे.

ज्येष्ठ भाषा संशोधक गणेश देवी यांच्या भाषांचे लोकसर्वेक्षणमध्येही चंदगडी भाषेचा समावेश केला गेला आहे. शिवाजी विद्यापीठाने बी.ए. आणि एम. ए. च्या अभ्यासक्रमात या भाषेचा समावेश केला आहे. आता या भाषेची दखल विद्यापीठ अनुदान आयोगानेही घेतली आहे. अलीकडेच यूजीसीच्या मराठी भाषेतील नेट, सेट परीक्षेसाठीच्या यादीतही याचा समावेश झाला आहे.

कोकणी, मराठी, कुडाळी, कन्नड याबरोबरच इंग्रजी, पोर्तुगीज भाषेचाही चंदगडवर प्रभाव आहे. बरेचसे शब्द या भाषांमधून आले असून चंदगड तालुक्यातील बहुतांश लोक ही भाषा आजही अभिमानाने बोलतात.



“ देशातील अनेक भाषा आधुनिकतेनुसार व सध्याच्या गतिमान युगात लुप्त होताना दिसतात. बोली भाषा या संवाद आणि भाषा समृद्धीच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. चंदगडी भाषेवर संशोधन केल्यामुळे या भाषेचे विविध पैलू समोर आले आहेत. या भाषेची दखल राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली आहे. ही चंदगडवासीयांसाठी अभिमानाची बाब आहे.

**- डॉ. नंदकुमार मोरे**